# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. १०/२०१५** **दि. ०८.०४.२०१५**

| | |
|---|---|
| **श्री सुनिल हरिश्चंद्र खानविलकर**<br>**मु.पो. मिठगव्हाणे**<br>**सडेवाडी**<br>**ता.राजापूर, जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. वि. रा. कांबळे,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री .सुनिल हरिश्चंद्र खानविलकर**<br>**(स्वतः तक्रारदार)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. अनिल वा. महाजन**<br>**कार्यकारी अभियंता, रत्नागिरी**<br>**२) श्री. मधुकर मोतिराम कांबळे**<br>**उपकार्यकारी अभियंता - राजापूर १** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

श्री सुनिल हरिश्चंद्र खानविलकर, मु.पो. मिठगव्हाणे सडेवाडी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांनी त्यांचे घरगुती सिंगल फेज वीज जोडणी मिळणेसाठी दि. १०.०८.२०१२ रोजी महावितरणकडे अर्ज केला असून अद्याप जोडणी मिळाली नाही अशी तक्रार त्यांनी मंचाकडे विहीत 'अ' नमुन्यात दि.०८.०४.२०१५ रोजी केली आहे. तक्रारीचा क्र.१० असा आहे.

तक्रार प्राप्त होताच दि. १३.०४.२०१५ च्या पत्र क्र. नुसार कार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग यांचेकडून तक्रारी संबंधात स्पष्टीकरण मागविण्यात आले. व निर्धारित वेळी म्हणजे दि.२३.०४.२०१५ चे पत्र क्र. ६५७ अन्वये उपकार्यकारी अभियंता राजापूर १ यांनी संबंधीत लेखी स्पष्टीकरण दिले व मंचास दि.२४.०४.२०१५ रोजी मिळाले. म्हणून आयोगाचे नियमावलीनुसार दि.०५.०५.२०१५ चे लेखी नोटीसीने दि.१३.०५.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आलेचे पक्षकाराना कळविणेत आले . परंतु सदस्य सचिव/ कार्यकारी अभियंता कोकण परिमंडल रत्नागिरी यांचे त्याचदिवशी असलेले तातडीचे कार्यालयीन कामकाजामुळे सदर सुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात आली. व नंतर पक्षकारांना पुनश्च दुरध्वनीने कळवून सदर सुनावणी दि. १०.०६.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता ठेवण्यात आली.

दि. १०.०६.२०१५ रोजी सुनावणीसाठी ग्राहकाचे वतीने स्वतः तक्रारदार श्री सुनिल हरिश्चंद्र खानविलकर मु.पो. मिठगव्हाणे सडेवाडी हे उपस्थित राहिले. महावितरणतर्फे श्री अनिल वा. महाजन, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी, श्री मोतीराम कांबळे, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग राजापूर १ उपस्थित राहिले.

ग्राहकातर्फे खुद्द तक्रारदार श्री सुनिल हरिश्चंद्र खानविलकर यांनी कथन केले की त्यांनी दि.१०.०८.२०१२ रोजी घरगुती जोडणी मिळावी म्हणून ए-१ नमुन्यात अर्ज केला आहे. व दि.२९.०३.२०१३ चे कोटेशन प्रमाणे रु. ६२०/- पा.क्र. १३०१२८७ दि.३०.०४.२०१३ रोजी रक्कम भरलेली आहे. तरी मला वीजजोडणी मिळाली नाही. मात्र दि.०९.०६.२०१५ रोजी कंपनीकडून वीजपुरवठा सुरु करुन मिळाला आहे. त्यासाठी जुना खांब वापरुन सर्व्हिस वायर जोडून वीज पुरवठा केला आहे. अशाप्रकारे केलेले काम यापूर्वीही शक्य होते. तसेही केले नाही व महावितरणने मला त्रास दिला व त्यांनी दि.०९.०६.२०१५ चे पत्रानुसार तक्रारमागे घेतलेचे कळविलेचे मान्य केले.

महावितरण तर्फे श्री अनिल वा.महाजन कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांनी तक्रारी संबंधात त्यांचा दि. ०२.०५.२०१५ लेखी खुलासा केला त्यात खालीलप्रमाणे घटनाक्रम आहे.

| | |
|---|---|
| दि. १०.०८.२०१२ | तक्रारदाराचा अर्ज प्राप्त झाला. |
| दि. ०३.०९.२०१२ | सदर अर्जाचे अंदाजपत्रक शाखा कार्यालयाकडून प्राप्त झाले. |
| दि.२९.०४.२०१३ | रोजी अंदाजपत्रक मंजूर झाले. |
| दि.२९.०४.२०१३ | रोजी ग्राहकास पैसे भरण्यास कोटेशन दिले. |
| दि.३०.०४.२०१३ | रोजी ग्राहकाने कोटेशनच्या रकमेचा भरणा केला. |

ग्राहकाने दि.३०.०४.२०१३ रोजी रक्कम भरणा केली असली तरी त्यांचेसाठी अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूर एल. टी. लाईन ०.०५ कि.मी. (१फेज २ वायर) चे काम करुन विजपुरवठा करणे गरजेचे होते. व सदर ग्राहकाचा घरगुती वीज जोडणी च्या प्रलंबित यादीमध्ये १२ वा क्रमांक होता. ज्येष्ठता यादीप्रमाणे काम करणेचे असल्यामुळे व सदर जोडणीचे काम (प्रकरण) हे डिपीडीसी योजनेअंतर्गत मंजूर असल्याने व शासनाकडून निधी प्राप्त न झालेने वीज जोडणी देता आली नाही. परंतू ग्राहकाची गैरसोय दूर करण्यासाठी त्यांना दि. ०९.०६.२०१५ रोजी वीज जोडणी दिली आहे. व ग्राहकांनी दिलेले दि.०९.०६.२०१५ रोजीचे तक्रार निवारण झालेबाबतचे व तक्रार मागे घेत असलेबाबतचे पत्र त्यांनी सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेले दस्तऐवज तसेच लेखी व तोंडी युक्तिवाद लक्षात घेता असे दिसते की दि.१०.०८.२०१२ रोजी वीज पुरवठा मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रक, मंजुरी कोटेशन देणे इत्यादी कार्यालयीन बाबीसाठी सुमारे ६ महिने व २० दिवस इतका कालावधी लागला. आयोगाच्या तत्कालिन कृती मानकांविषयक विनियमातील कलम ४.३,४.४ प्रमाणे परिक्षण करुर कोटेशन देणेसाठी अनुक्रमे १० व २० दिवसांची मुदत असताना या विलंबाचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही. ग्राहकांने दि.३०.०४.२०१३ रोजी रक्कम जमा केलेचे महावितरणचे पत्र क्र. १) ६५७ दि.२३.०४.२०१५ व २)०२३६६ दि. ०२.०५.२०१५ मध्ये मान्य केले आहे. ग्राहकाकडून कोणतीही पुर्तता राहिली असल्याबाबत महावितरणकडून नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे आयोगाच्या कृतीमानकांच्या विनियमातील कलम ४.६ नुसार दिलेल्या क्वोटेशन प्रमाणे रक्कम जमा केलेनंतर कलम ४.८ प्रमाणे ३ महिन्यात म्हणजे दि.३०.०७.२०१५ पर्यंत वीज पुरवठा सुरु करणे हे महावितरणवर बंधनकारक होते सदर तक्रारदारांचा जेष्ठता यादीतील क्र.१२ असला कृती मानके न पाळण्याची मुभा महावितरणला देण्यात आली नाही.

यासंदर्भात महावितरणच्या स्वतःच्या पुरवठयाच्या अटीमधील खालील मजकूर लक्षात घेणे आवश्यक आहे.

कलम २.१ पान क्रं.९ 'unless the Act or Rules & Regulations framed thereunder or any other law for the time being in force require otherwise, the MSEDCL shall release the power supply (new connection) in each tariff category, as practicable, on a 'First come,First served' basis'.

अर्थात जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देतानाच कृती मानकांची कालमर्यादाही पाळणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी कृतीमानके न पाळल्यामुळे झालेल्या प्रत्येक टप्प्यातील विलंबास महावितरणचे अधिकारी जबाबदार आहेत. व ग्राहकाने थेट मंचाकडे वीजपुरवठा लवकरात लवकर मिळावा म्हणून तक्रार केली आहे. तक्रारदार विलंबाबाबत भरपाईसाठी पात्र आहेत. परंतु त्यांनी भरपाईसाठी महावितरणकडे मागणी केली नाही.

प्रस्तुत प्रकरणी महावितरण कंपनीने ग्राहकास दि.०९.०६.२०१५ रोजी वीजजोडणी दिलेली आहे. व ग्राहकानेही त्यांचे दि.०९.०६.२०१५ रोजी महावितरणला पत्र देऊन माझे महावितरणकडून नवीन कनेक्शनचे काम दि.०९.०६.२०१५ रोजी पूर्ण झालेले असून त्याबाबत

आता महावितरणबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही व माझे पूर्वीच्या तक्रारीचे निवारण झालेले असून ती मी मागे घेत आहे असे नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

**१) तक्रारदार श्री. सुनिल हरिश्चंद्र खानविलकर मु.पो. मिठगव्हाणे, सडेवाडी, ता.राजापूर यांची तक्रार निकाली काढणेत येत आहे.**

**२) खर्च किंवा अनुषंगिक बाबी करीता कोणताही आदेश नाही.**

**३) आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री वि.रा. कांबळे**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १९.०६.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**